।। श्री गणेशाय नमः ।।

कुणाल वधवा
9765595037
9405171771

# श्रीराम बोरवेल्स

जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२२६ ■ बुधवार २० मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४



बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


# पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीनंतर आता देशात येणाऱ्या आर्थिक संकटात सर्व भरडणार : गांधी

**नवी दिल्ली, दि. १९ : पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्यांच्या खिशावर ताण वाढत असताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. देश लवकरच मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करणार असून त्याचा सर्वाधिक फटका युवक, शेतकरी, कामगार आणि लघुउद्योजकांना बसेल, असा इशारा त्यांनी दिला. देशातील सध्याची आर्थिक व्यवस्था काही मोजक्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी तयार करण्यात आली आहे, असा दावा त्यांनी केला.**



रायबरेली दौऱ्यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, सध्याची आर्थिक व्यवस्था मोजक्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी आहे. ही व्यवस्था जास्त काळ टिकणार नाही. पण, सध्या या व्यवस्थेमुळे लवकरच देशाला मोठा आर्थिक धक्का बसू शकतो. जो आर्थिक झटका बसणार आहे त्याचा परिणाम उद्योगपतींवर होणार नाही, तर सामान्य नागरिकांवर होणार आहे.

### अदानी-अंबानींच्या लाभाची व्यवस्था

राहुल गांधी यांनी उद्योगपती गौतम अदानी आणि मुकेश अंबानी यांचा उल्लेख करत केंद्र सरकारची आर्थिक धोरणे काही निवडक उद्योगसमूहांना लाभदायक असल्याचा आरोप केला. या धोरणांचा सर्वाधिक फटका उत्तर प्रदेशातील युवक, शेतकरी, मजूर आणि छोट्या व्यावसायिकांना बसणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नॉर्वे दौऱ्याचा उल्लेख करत राहुल गांधी यांनी सरकारवर टीका केली. सरकार लोकांना परदेश प्रवास कमी करण्याचा सल्ला देत आहे. मात्र, पंतप्रधान स्वतः सातत्याने परदेश दौरे करत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

### खरगे यांचाही सरकारवर हल्लाबोल

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांवरून मोदी सरकारवर टीका केली. ही परिस्थिती सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे निर्माण झालेला संकटाचा भाग असल्याचे सांगत त्यांनी सर्वसामान्यांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकला जात असल्याचा आरोप केला.

### पेट्रोल-डिझेल दरात पुन्हा वाढ

अवघ्या चार दिवसात पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलच्या दरात ९१ पैशांनी तर डिझेलच्या दर ९४ पैशांनी वाढ करण्यात आली आहेत. त्यामुळे मुंबईतील पेट्रोलचा दर थेट १०७.४९ तर डिझेलचा दर प्रति लिटर (पान ४ वर)

## पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारणे गुन्हा नव्हे मी हेर नाही - हेले लिंग



ओस्लो, दि.१९ : भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या देशांच्या दौऱ्यावर आहेत. राजधानी ओस्लोमध्ये पंतप्रधान जोनास गहर स्टोर यांच्या सोबत एक संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यामध्ये नॉर्वेच्या पत्रकार हेले लिंग यांनी मोदींना विचारलेल्या प्रश्नाने मोठा गोंधळ झाला. त्यांनी ज्या पद्धतीने प्रश्न विचारला, त्यानंतर त्यांच्या हेतूवर शंका घेण्यात आली. यानंतर पत्रकार हेले लिंग यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एकापाठोपाठ एक अनेक पोस्ट केल्या आहेत. आधीपासून तयार असलेली उत्तरे स्विकारण्याऐवजी थेट उत्तर मागणे, हे पत्रकारांचे काम आहे, असे म्हणत हेले लिंग यांनी आपला बाणा दाखविला आहे. जागतिक पत्रकारिता स्वातंत्र्यात नॉर्वे अव्वल (पान ४ वर)

# देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनविण्यासाठी बळ देणार राज्याचे अणुऊर्जा निर्मितीसाठी करार- ना. फडणवीस

**मुंबई, दि.१९ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.**



मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य ऊर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे. ही गुंतवणूक केवळ ऊर्जा (पान ४ वर)

## पिसाळलेल्या, त्रासदायक कुत्र्यांना मारण्याची सुप्रीमची परवानगी

नवी दिल्ली, दि. १९ : सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी प्रशासनाला पिसाळलेल्या आणि आक्रमक भटक्या कुत्र्यांचे इच्छामरण घडवून आणण्याची परवानगी दिली. भटक्या कुत्र्यांच्या स्थलांतराबाबतच्या आपल्या पूर्वीच्या आदेशात सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांच्या एका संचावर (गटावर) निकाल देताना, सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश दिले.

प्राणी जन्म नियंत्रण नियमावली आणि इतर लागू वैधानिक कार्यपद्धतींनुसार, प्रशासनाने मानवी जीवन आणि सुरक्षेला निर्माण झालेला धोका प्रभावीपणे दूर करण्यासाठी कायदेशीररित्या अनुज्ञेय उपाययोजना (पान ४ वर)

# नीट प्रकरणी मोटेगावकरच्या मुलाची चौकशी सीबीआयने तीन विद्यार्थी-पालकांना बोलावले

**पुणे, दि. १९ : नीट पेपरफुटीचा कट शिवराज मोटेगावकरने साथीदारांना हाताशी धरुन सुनियोजितपणे आखल्याचे सीबीआयच्या तपासात स्पष्ट झाले आहे. शिवराज मोटेगावकरच्या तपासात धक्कादायक माहिती समोर येत आहे. एनटीएशी निगडीत प्राध्यापकांशी मोटेगावकरचे संबंध होते. पी.व्ही.कुलकर्णीसोबत मोटेगावकरचे घनिष्ठ संबंध होते. मोटेगावकरने परीक्षेपुर्वीच प्रश्न मिळवून उत्तरांसह मुलांपर्यंत पोहोचवले. त्यानंतर आता शिवराज मोटेगावकरच्या मुलाची देखील सीबीआय कार्यालयात चौकशी सुरू आहे.**

शिवराज मोटेगावकर याच्या मुलाची पुण्यातील सीबीआय कार्यालयामध्ये चौकशी सुरू आहे. मोटेगावकरच्या मुलाने बारावीची परीक्षा दिली आहे आणि त्यालाही फुटलेल्या नीट प्रश्नपत्रिकाचा फायदा झाल्याची चर्चा आहे. मोटेगावकरच्या मुलासोबत आरसीसी क्लासमध्ये शिकणाऱ्या आणखी तीन विद्यार्थ्यांची त्यांच्या पालकांसह सीबीआय ऑफीसमध्ये चौकशी केली जात आहे. नीटचा पेपर फुटला, त्याचा शिवराज मोटेगावकर कसा बाजार मांडला याच्याबद्दल सीबीआयने जो रिमांड रिपोर्ट सादर केला त्यामध्ये सांगितलं होते की, हा पेपर विकताना, पैसे कमावताना, मोटेगावकरने त्याच्या स्वतःचा मुलगा जो आता नुकताच बारावी परीक्षा आणि नीटची परीक्षा दिली आहे, त्या स्वतःच्या मुलाला देखील या फुटलेल्या पेपरच्या माध्यमातून फायदा पोहोचवण्याचं काम केलं, किंवा या मुलाला आधीच प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिली, अशा प्रकारची सीबीआयची माहिती आहे. त्यामुळे सीबीआयने शिवराज मोटेगावकरच्या मुलाला सीबीआयच्या ऑफिसमध्ये चौकशीसाठी बोलवले आहे. शिवराज (पान ४ वर)

## धडगावला कुत्र्यांचा हल्ला बालीका गंभीर जखमी

नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - मोकाट कुत्र्यांनी हल्ला करीत चावा घेतल्याने पाच वर्षीय चिमुकली गंभीर जखमी झाल्याची घटना धडगाव येथे घडली. या बालीकेवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मोकाट कुत्र्यांचा नगरपंचायतीने बंदोबस्त करावा, अशी मागणी होवू लागली आहे.

धडगाव येथील वनविभाग कार्यालय व मोलगी रोड परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. अखेर काल मोकाट कुत्र्यांनी रस्त्याने जाणाऱ्या पाच वर्षीय बालीकेवर हल्ला केला. या कुत्र्याच्या हल्लयात बालीका गंभीर जखमी झाली. यावेळी तिने आरडा ओरड केल्याने परिसरातील (पान ४ वर)

# संदेशभूमी व लाळिंग किल्ला परिसराच्या विकासासाठी निधी मिळणार- खा.बच्छाव

**धुळे , दि.१९ - धुळे लोकसभेच्या खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांच्या पुढाकारातून धुळे शहर व परिसरातील ऐतिहासिक स्थळांच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.**



धुळ्यातील संदेशभूमी (ट्रॅव्हल बंगला)तसेच लाळिंग किल्ला व लांडोर बंगला परिसर या ऐतिहासिक ठिकाणांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांच्याकडे खा.डॉ. शोभा बच्छाव यांनी पाठपुरावा केला असून, या विकासकामांसाठी लवकरच निधी मंजूर होणार असल्याचे आश्वासन केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांनी दिले आहे. धुळे जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा देणाऱ्या या महत्त्वपूर्ण विकासकामांमुळे जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून नवी ओळख मिळणार आहे. विशेष म्हणजे या दोन्ही स्थळांचा संबंध भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धुळे भेटीशी जोडलेला असल्याने या जागांचे संवर्धन करून प्रेरणास्थळ म्हणून विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

धुळे शहरातील संदेशभूमी (ट्रॅव्हल बंगला) हे ऐतिहासिक ठिकाण असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी न्यायालयीन कामानिमित्त धुळे दौऱ्यावर असताना ३१ जुलै १९३७ रोजी येथे वास्तव्यास असल्याची नोंद आहे. या पार्श्वभूमीवर खा. डॉ. शोभा बच्छाव यांनी या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ग्रंथालय व संविधान भवन उभारण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यासोबतच परिसरात सुशोभीकरण, उद्याननिर्मिती, प्रकाश व्यवस्था, रस्ते, बसण्याची (पान ४ वर)

## कवयित्री पूजा सोनारना हिरकणी पुरस्कार

नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- तोरखेडा तालुका शहादा येथील ग्रामीण भागातील रहिवासी आणि आदिवासी जिल्ह्यात साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पूजा सोनार यांना नाशिक येथे हिरकणी या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हिरकणी बहुद्देशिय संस्था, जालना, यांच्या वतीने आयोजित पुस्तक प्रकाशन, काव्य संमेलन व पुरस्कार सोहळा कार्यक्रमात, साहित्य क्षेत्रातील नामवंत लेखक चंद्रकांत वानखेडे (पान ४ वर)



# बभळाज येथे किसान सभेचे आंदोलन आठ तास वीजपुरवठा देण्याची मागणी

**शिरपूर दि.१९ (का.प्र.) : तालुक्यातील बभळाज परिसरात शेतीला आठ तास वीजपुरवठा करावा अशा मागणीसाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेतर्फे १८ मेस तेथील सब स्टेशनच्या प्रवेशद्वारावर धरणे आंदोलन करण्यात आले.**

किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष ॲड. हिरालाल परदेशी यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. उप अभियंता चेतन पाटील यांना मागणीचे निवेदन देण्यात आले. परिसरातील शेतीला विजेअभावी पाणी देणे शक्य होत नसल्यामुळे पिकांचे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन दररोज आठ तास सलग वीजपुरवठा करावा अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी ॲड.हिरालाल परदेशी, ॲड.संतोष पाटील, ॲड.कवरलाल कोळी, अर्जुन कोळी, जितेंद्र करंकाळ, वसंत कोळी,जगन परदेशी, विठ्ठल परदेशी, अनंत परदेशी, अमोल परदेशी उपस्थित होते.

## दुधाळे शिवारात घरफोडी ऐवज लंपास

नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - दुधाळे शिवारात १७ मे रोजी मध्यरात्रीनंतर चोरट्यांनी संधी साधत तिघांच्या घरात प्रवेश करुन सव्वा दोन लाखांचा ऐवज लंपास केला.

चोरीमध्ये सोन्याचे दागिने,चांदीच्या अंगठया तसेच रोकड रकमेचा समावेश आहे. शिवम पार्क दुधाळे शिवारातील योगेश फूलपगारे, वामन पांडव ठाकरे व प्रसाद देवीदास माळी यांच्या घरात चोरटयांनी प्रवेश करीत दागिने व रोकड लंपास केले. एकाच रात्री सुमारे दोन लाख (पान ४ वर)

# भुईमुग शेंगांच्या वाटणीवरुन वाद भावंडामध्ये हाणामारी, फिर्याद दाखल

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- शेतातील भागीदारीच्या भुईमुग शेंगांवरुन वाद झाल्याने एकाच कुटुंबातील भावंड असलेल्या लोकांमध्ये हाणामारी झाल्याची घटना बोरीचा पाटीलपाडा येथे घडली. याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीवरुन सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

धडगाव तालुक्यातील बोरीचा पाटीलपाडा येथील खाऱ्या उताऱ्या पावरा व पिद्या उताऱ्या पावरा यांच्या भागीदारीच्या शेतातील भुईमुगच्या शेंगा न विचारता परस्पर विकून दिले. त्यामुळे विचारणा केल्याचे वाईट वाटून पिद्या पावरा याने कुऱ्हाडीने कपाळावर वार करीत खाऱ्या उताऱ्या पावरा यांना जखमी केले. तसेच तिघांनी हाताबुक्क्यांनी मारहाण करीत शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत खाऱ्या उताऱ्या पावरा यांनी धडगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पिद्या उताऱ्या पावरा, मनुबाई गेला पावरा, सोभी पिद्या पावरा, रहेमत पिद्या पावरा या चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच परस्परविरोधी फिर्याद पिद्या उताऱ्या पावरा यांनी दिली. त्यात म्हटले आहे की,शेतातील भागीदारीच्या भुईमुग शेंगा पिकांचा हिस्सा देत नाही या कारणावरुन लुल्या उताऱ्या पावरा याने दगडाने तर इतर दोघांनी लाकडी काठीसह हाताबुक्क्यांनी मारहाण करुन पिद्या पावरा यांना जखमी केले. तसेच शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी लुल्या उताऱ्या पावरा, खात्या उताऱ्या पावरा, उंदला उताऱ्या पावरा या तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नो - व्हेईकल डे निमित्त सीईओंसह अधिकारी सायकलने जि.पत पोहचले

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्यासह अधिकारी कर्मचाऱ्यांनी नो-व्हेईकल डे पाळत दुचाकी व सायकलीने जिल्हा परिषद कार्यालयात दाखल झाले. यातून नागरीकांना उर्जा व इंधन बचतीचा संदेश दिला आहे.**

नंदुरबार जिल्हा परिषदेतर्फे सोमवारी नो व्हेईकल डे पाळण्याचे आवाहन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी चारचाकी वाहनावर न येता सायकल व दुचाकीने यावे असे आवाहन करण्यात आले. पश्चिम आशीयाई संकट, वाढते इंधनाचे दर व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता उर्जा बचत व पर्यावरण संरक्षणासाठी जिल्हा परिषदेने काल सोमवारी नो-व्हेईकल डे राबविला. नंदुरबार जि.प.चे सीईओ नमन गोयल यांनी देखील शासकिय गाडी बाजूला ठेवून ई-बाईक स्वतः चालवून आणत जिल्हा परिषदेत दाखल झाले. तसेच जिल्हा परिषदेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी चारचाकी वाहनांचा वापर टाळून दुचाकी व सायकलीने येत कार्यालय गाठले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्यासह अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रत्येक सोमवारी नो व्हेईकल डे पाळण्याची शपथ घेतली. जिल्हा परिषदेने राबविलेल्या या उपक्रमाला अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून प्रतिसाद मिळाला आहे.

## सावरकरांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान

शहादा, दि.१९(का.प्र.)- शहादा शहरात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित एका भव्य व्याख्यान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्राचे प्रसिद्ध सिने अभिनेते आणि प्रगल्भ वक्ते शरदजी पोंक्षे उपस्थित राहणार असून, त्यांच्या ओजस्वी वाणीतून सावरकरांचा धगधगता इतिहास ऐकण्याची सुवर्णसंधी शहादेकरांना मिळणार आहे. हा कार्यक्रम शुक्रवार दि. २२ मे रोजी सायंकाळी ठीक ७:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. डोंगर रोडवरील कै.नरोत्तम सजन मैदान,पटेल रेसिडेन्सी समोर शहादा येथे हा व्याख्यान सोहळा पार पडणार आहे.

# पोलिसांनाही हेल्मेट वापरणे सक्तीचे अधीक्षक विशाल आनंद यांचा निर्णय

**धुळे, दि.१९- दुचाकी वरून येणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनाही हेल्मेट वापरणे सक्तीचे झाले आहे. हेल्मेटशिवाय पोलीस अधीक्षक कार्यालयात प्रवेश दिला जाणार नाही. अधीक्षक विशाल आनंद यांनी याबाबत पोलीस प्रशासनास सूचना दिली. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक कार्यालयात येणारे अधिकारी कर्मचाऱ्यांना हेल्मेटबाबत प्रबोधन करण्यात आले.**

पोलीस अधीक्षक यांनी हेल्मेट वापराबाबत कडक भूमिका घेतली असून त्यानुसार बुधवार दि.२० मे पासून सर्वांना हेल्मेट सक्ती लागू करण्यात आली आहे. अधीक्षक कार्यालयात दुचाकी, मोटर सायकलने येणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना हेल्मेट शिवाय कार्यालयात प्रवेश मिळणार नाही. नियम मोडणाऱ्यांवर कठोर कार्यवाही केली जाईल, सेवा पुस्तकातही तशी नोंद करण्यात येईल, त्याचे संकेतही अधीक्षकांकडून देण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस दलात शिस्त आणि रस्ता सुरक्षेबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्वतः पुढाकार घेत सर्वप्रथम पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनाच हेल्मेट वापरण्याची सक्ती केली आहे. वाहतूक नियमांचे पालन करणे, अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी (पान ४ वर)

## अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**शिंदखेडा, दि.१९- शिंदखेडा तालुक्यातील वायपूर गावाच्या शिवारात एका अनोळखी पुरुषाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शिंदखेडा पोलीस स्टेशन येथे दि. १७ मे रविवार रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयतक सुरू आहेत.**

मिळालेल्या माहितीनुसार, वायपूर गावातील अरुण विठ्ठल पवार यांच्या शेतात हा मृतदेह आढळून आला. मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत असल्याने संबंधित व्यक्तीची ओळख अद्याप पटू शकलेली नाही. मृत व्यक्तीचे वय अंदाजे (पान ४ वर)

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातून वाळूसह वाहन चोरीचा एकावर गुन्हा

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातून जप्त केलेले वाळूने भरलेले वाहन परवानगीशिवाय पळवून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी निखिलकुमार त्रिलोकचंद जैन (रा. धुळे ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, वाहन क्रमांक एम.एच-१८-बी.झेड-३६४२ हे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जप्त अवस्थेत उभे होते. सदर वाहनात अंदाजे ७.५ ब्रास वाळू होती. वाहन व वाळूची एकूण किंमत सुमारे ३५लाख ४० हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आरोपीने कोणतीही परवानगी न घेता तसेच दंडाची रक्कम न भरता शासनाच्या ताब्यातील वाहन व त्यातील मुद्देमाल चोरी करून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोसई किरण पाटील करीत आहे.


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,44,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,57,500 रु.+3% GST
चांदी- 2,73,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


# ई-चलन संदर्भातील सकारात्मक भूमिका घेऊ- ना.प्रताप सरनाईक

मुंबई, दि.१९ : कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत भेट घेऊन ई-चलन प्रणाली, वेगमर्यादा नियम, एएनपीआर कॅमेरे तसेच दंड आकारणी संदर्भातील विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वाहतूकदारांच्या मागण्यांबाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, माजी आमदार सुजित मिणचेकर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीचे (पान ४ वर)



# शिंदखेडा शहरातील अतिक्रमण प्रश्नी दुतर्फा दहा मिटर तोडण्याची मागणी

**शिंदखेडा, दि.१९ (प्रतिनिधी) - शिंदखेडा शहरातील राज्य महामार्ग क्रमांक १२ वरील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसंदर्भात तालुकावासीयांमध्ये तणाव आणि संताप निर्माण झाला आहे. व्यापारी संघटना व काही नागरिक प्रशासनावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत, तर दुसरीकडे सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि महिला या अतिक्रमणामुळे निर्माण झालेल्या गैरसोयीमुळे चिंतेत आहेत.व्यापारी असोसिएशनकडून प्रशासनास निवेदन दिले गेले असून, दुतर्फा फक्त दहा मीटरपर्यंत अतिक्रमण काढावे, संपूर्ण तोडफोड करू नका, अशी मागणी करण्यात आली आहे.**

या मागणीनंतर शिंदखेडा शहरातील नागरिक संतप्त झाले असून, प्रशासनाने कोणत्याही दबावाखाली न येता कठोर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.शिंदखेडा शहरातील मुख्य रस्ता अनेक वर्षांपासून दयनीय अवस्थेत आहे. ठिकठिकाणी खड्डे पडल्याने रस्ता अरुंद झाला आहे, अवजड वाहनांची वाहतूक देखील सुरू झाली आहे ज्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण (पान ४ वर)





जांभुळ ज्युस मिळेल

नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.

संकेत नित्या फार्म

जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६



महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई व महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त,
श्री. गजानन माऊली सेवाभावी संस्था संचलित,
मा. आजितदादा पवार नर्सिंग इन्स्टिटयुट,

सेवा सुपरस्पेशालिटी ॲण्ड क्रिटीकल केअर सेंटर
मिशन कंपाऊंड, साक्री रोड, धुळे.



प्रवेश देणे सुरु

General Nursing & Midwifery (GNM)
नर्सिंग डिप्लोमा

- प्रशिक्षणाचा कालावधी - ०३ वर्ष .
- शैक्षणिक पात्रता - इयत्ता १२ वी कला / विज्ञान / कॉमर्स उत्तीर्ण, तसेच ANM अभ्यासक्रम उत्तीर्ण असणाऱ्यास प्राधान्य.
- केंद्र व राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती ( SC & ST ) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक शुल्काची स्कॉलरशिपद्वारे १०० % प्रतिपुर्ती. ( Free Admission )
- इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता हप्त्याने शैक्षणिक शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध.
- मुलींकरीता होस्टेल व मेस सुविधा उपलब्ध .
- प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी खान्देशातील पहिले NABH नामांकन प्राप्त २३० बेडचे सुसज्ज व अत्याधुनिक सोयीयुक्त रुग्णालय .

संपर्कः- 7972481374 / 8080963658 / 8605745076

आपला महाराष्ट्र

# विविध प्रजाती लुप्त होण्याचे प्रमाण चिंताजनक

नुकताच म्हणजे १७ मे रोजी जागतिक पातळीवर लुप्त झालेल्या प्राण्यांचा दिवस साजरा झाला.खरोखरच शिकारीच्या हव्यासापोटी खूप प्राणी आपल्याकडे देखील लुप्त झालेले आहेत. गिधाडांची पैदास आपल्याला करावी लागत आहे. राज्य प्राणी शेकरूचेही तसेच आहे.एवढे कशाला. जास्तदूर जाण्याची आवश्यकता नाही. आपल्या सातपुड्याच्या जंगलात आता नेहमी सापडणारे प्राणी दिसत नाहीत.एकतर त्यांचा अधीवास आपण संपविला किंवा शिकार करून त्यांना संपविले. काही दिवसांपूर्वीच नंदुरबार जिल्ह्यात जनावरे जंगलातून पकडून हिकमतीने बाहेर पाठविताना वन विभागाने पकडले. त्यात कोल्हे, लांडगे, तसेच इतर प्राणी आणि पक्षी होते.याचा अर्थ नव्याने प्रजनन झालेल्या प्राण्यांची ही शिकार होती. अशा तऱ्हेने सर्वत्र प्राण्यांचे आणि पक्षांचे शत्रू लपून बसलेले आहेत.परिणामी लुप्त प्रजातींच्या नावाने दिवस पाळण्याची आपल्यावर वेळ आली. तसा तर पृथ्वीवरील जीवनाचा इतिहास कोट्यवधी वर्षे जुना आहे, ज्यामध्ये असंख्य प्रजाती निर्माण झाल्या आणि कालांतराने नष्टही झाल्या. ही प्रक्रिया नैसर्गिकरित्या होतच राहिली आहे, परंतु आधुनिक काळात मानवी हालचाली आणि हस्तक्षेप यामुळे तिला प्रचंड वेग मिळाला आहे. यापूर्वीही ज्वालामुखी, उल्कापात आणि नैसर्गिक हवामान बदलांमुळे अनेक प्रजाती नामशेष झाल्या. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर मनुष्याने प्राण्यांना नामशेष करण्याचा वेग खूपच वाढवला आहे.

मागील ५० वर्षांत पृथ्वीवरील अर्ध्याहून अधिक पक्षी, सस्तन प्राणी, सरपटणारे प्राणी, उभयचर आणि मासे नष्ट झाले आहेत. मागील २००० वर्षांत सुमारे २०० प्रजाती नामशेष झाल्या आहेत, आणि सध्या नामशेष होण्याचा वेग नैसर्गिक दरापेक्षा १००० पट अधिक आहे. काही संस्थांच्या अभ्यासांनुसार पृथ्वीवर सुमारे ८० लाख प्रजाती आहेत.

निसर्ग संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांच्या शोधानंतर त्यांनी जी यादी केली त्यानुसार ४८,६०० हून अधिक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि या नामशेष होण्यामागील मुख्य कारण मानवी हस्तक्षेप आणि वाढता हव्यास आहे. अधिवासाचा नाश, अवैध शिकार, प्रदूषण आणि हवामान बदल. जंगलतोड, शहरीकरण आणि शेतीच्या विस्तारामुळे प्राण्यांचे राहण्याचे स्थान संपत आहे. झपाट्याने बदलणाऱ्या तापमानाशी अनेक प्रजाती स्वतःला जुळवून घेऊ शकत नाहीत. रसायने आणि प्लास्टिकमुळे पर्यावरणीय तंत्र बिघडले असून त्याचा विपरीत परिणाम प्राण्यांवर झाला आहे. प्रजाती नामशेष झाल्याने अन्नसाखळी खंडित होते, त्याचा शेवटी मानवी जीवन, शेती आणि निसर्गाच्या संतुलनावर गंभीर परिणाम होतो. एका सूक्ष्म जीवापासून ते समुद्रातील निळ्या व्हेलपर्यंत सर्व जीव वातावरणातील नायट्रोजनचे संतुलन राखण्याची भूमिका बजावतात; आपल्या वातावरणातील संतुलन टिकवण्यासाठी प्रत्येक प्रजाती महत्त्वाची आहे.मात्र माणूस ते समजून घेण्यास तयार नाही.

जैवविविधतेचे नुकसान थांबवण्यासाठी जागतिक पातळीवर कठोर संरक्षणात्मक उपाययोजना, हवामान बदल नियंत्रण आणि नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण यावर भर देणे आवश्यक आहे. मागील शतकात उत्साही आणि समर्पित संस्था व समुदायांनी अनेक प्राणी आणि वनस्पतींना नामशेष होण्याच्या उंबरठ्यावरून वाचवले आहे आणि आता या प्रजाती पुन्हा वाढत-फुलत आहेत. ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणावी लागेल.

निसर्ग संरक्षणासाठी जगभरात विविध प्रयतक केले जात आहेत. लुप्त प्रजातींसाठी बंदिस्त प्रजनन कार्यक्रम, वन्यजीव अभयारण्ये आणि आंतरराष्ट्रीय नियम व कायदे. भारतात नामशेष होत असलेल्या प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी मुख्यतः वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ सारखी कायदेशीर सुरक्षा उपलब्ध आहे, त्याअंतर्गत १९७३ मध्ये प्रोजेक्ट टायगर, १९९२ मध्ये प्रोजेक्ट एलिफंट आणि २०२२ मध्ये प्रोजेक्ट चित्ता यांसारख्या विशेष योजना राबविल्या जात आहेत. जगातील सर्वाधिक जैवविविधता असलेल्या देशांपैकी एक असूनही भारतात सुमारे १४ टक्के प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे संकटग्रस्त प्रजातींच्या संरक्षण आणि व्यवस्थापनासाठी संरक्षणात्मक प्रजनन आणि सहाय्यक प्रजनन धोरणे आखून त्यावर काम करणे महत्त्वाचे आहे. हैदराबादला असलेल्या लुप्त प्रजाती संरक्षण संस्थेत आधुनिक जैवतंत्रज्ञान आणि प्रयोगशाळांचा वापर करून वन्यजीवांच्या कृत्रिम गर्भाधान आणि डीएनए बँक यांसारख्या तंत्रांचा उपयोग करून संरक्षणाच्या दिशेने महत्त्वाचे काम केले जात आहे. ही भारतातील एकमेव प्रयोगशाळा अशी आहे की, वन्यजीवांमधून शुक्राणू गोळा करून त्यांना सुरक्षित ठेवणे प्रजननासाठी त्यांचा वापर करणे अशा पद्धती विकसित केल्या गेल्या आहेत. लुप्त झालेले काळवीट, चितळ किंवा हरिण आणि निकोबार कबूतर यांचे यशस्वी प्रजनन घडवून आणण्यात आले आहे. या उपक्रमाद्वारे भारतीय वन्यजीवांसाठी आनुवंशिक साधन बँक स्थापन करण्यात आली आहे. आतापर्यंत भारतीय वन्यजीवांच्या २३ प्रजातींची आनुवंशिक साधने संकलित करून जतन करण्यात आली आहेत.

१९९२ मध्ये एका परिषदे दरम्यान स्वीकारण्यात आलेला जैवविविधता करार हा जैवविविधतेचे संरक्षण, त्याचा शाश्वत वापर आणि त्यातून मिळणाऱ्या लाभांचे न्याय्य वितरण यांवर केंद्रित आहे. याचा उद्देश विविध वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीवांच्या प्रजातींचे संरक्षण करणे तसेच नैसर्गिक संसाधनांचा वापर करून दीर्घकालीन संतुलन टिकून राहील आणि जैव सामुग्रीतून औषधी सारखा उपयोग होईल असे प्रयतक सुरू आहेत.सर्व देशांमध्ये ही साधने समसमान वाटली जातील असा करार करण्यात आलेला आहे. त्यास सर्व देशांनी मान्यता दिलेली आहे. हा करार सरकारांना आपली धोरणे आणि योजना तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतो. यात स्थानिक समुदाय आणि पारंपरिक ज्ञानाच्या भूमिकेलाही महत्त्व देण्यात आले आहे. जैवविविधता करार हा जागतिक स्तरावर पर्यावरण संरक्षणासाठीच्या सर्वात महत्त्वाच्या करारांपैकी एक आहे, तो पृथ्वीवरील जीवनाचे संतुलन टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. नामशेष होत असलेल्या प्रजातींचे संरक्षण हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नसून मानवी अस्तित्वाशी तो संबंधित प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय प्रयत्न असूनही या योजनांचे यश देशांच्या राजकीय इच्छाशक्तीवर, स्थानिक समुदायांच्या सहभागावर आणि शाश्वत विकासाच्या मॉडेलवर अवलंबून आहे. नेमके मॉडेल माणूस सोडून इतर सर्व घटकांच्या जीवावर उठले आहेत. माणसाचा चंगळवाद आणि अप्पलपोटेपणा या परिस्थितीस कारणीभूत आहे. म्हणूनच जीवो जीवस्य जीवनम् हे तत्वज्ञान माणसाने समजून घेण्याची गरज आहे तरच सबंध जीवसृष्टी वाचू शकेल.

# पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवेने पंपांवर वाहनांच्या मोठ मोठ्या रांगा

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - नंदुरबार शहरात पेट्रोल आणि डिझेल टंचाईच्या अफवेने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून शहरातील सर्वच पेट्रोलपंपांवर मंगळवारी दिवसभर वाहनांच्या प्रचंड रांगा लागलेल्या दिसून आल्या. दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहू वाहनधारकांनी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पेट्रोल-डिझेल भरण्यास सुरुवात केल्याने अनेक पेट्रोलपंपांवरील साठा वेगाने संपत आहे. काही ठिकाणी स्टॉक उपलब्ध नाही असे फलक लावण्याची वेळ पेट्रोलपंप चालकांवर आली आहे.**



गेल्या अनेक दिवसांपासून नंदुरबार शहरात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू होता. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणानंतर भविष्यात इंधन टंचाई निर्माण होऊ शकते, अशी अफवा सोशल मीडियावर वेगाने पसरली. या अफवेचा परिणाम थेट पेट्रोलपंपांवर दिसून आला असून नागरिकांनी गरजेपेक्षा अधिक इंधन भरण्यास सुरुवात केली आहे.

सायंकाळनंतर शहरातील प्रमुख पेट्रोलपंपांवर परिस्थिती अधिकच गंभीर झाली. चारचाकी वाहनांच्या रांगा तर मुख्य रस्त्यांपर्यंत पोहोचल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली.

सीएनजी पंपांवरही वाहनांच्या रांगा वाढल्या असून अनेक वाहनधारक पर्यायी इंधनाकडे वळताना दिसत आहेत. दरम्यान, मनमाड डेपोवरून पेट्रोल आणि डिझेलचा नियमित पुरवठा सुरू असल्याची माहिती संबंधित डीलर्सकडून देण्यात आली आहे. मात्र नागरिकांकडून भीतीपोटी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त साठवणूक केली जात असल्याने कृत्रिम टंचाई निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे.

पेट्रोलपंप चालकांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून पुरेसा इंधनसाठा उपलब्ध असल्याचा दावा केला आहे. तरीदेखील शहरात निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणामुळे पेट्रोलपंपांवरील गर्दी कमी होण्याचे नाव घेत नाही. प्रशासनाने देखील परिस्थितीवर लक्ष ठेवले असून नागरिकांनी शांतता राखून आवश्यक तेवढेच इंधन घ्यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# गिरीश टाटीया जितो चे जिल्हा उपाध्यक्ष झाले

शिंदखेडा- येथील वर्धमान कोटेक्स व पुष्पक ॲग्रो यांचे संचालक गिरीश रमेश टाटीया यांची जितो या संघटनेच्या धुळे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली. ही निवड दोन वर्षासाठी आहे.३१मे रोजी धुळे येथे पद ग्रहण समारोह होणार आहे.

जस्टीस ऑफ इंडिया ट्रेडर्स ऑर्गनायझेशन(जितो) एक व्यावसायिक आणि सामाजिक संघटना आहे. जी मुख्यतः जैन समुदायातील उद्योजक व्यावसायिक आणि व्यावसायिकांना एकत्र आणण्याचे काम करते.तिची स्थापना २००७पासून झाली असून,जैन समाजातील व्यावसायिकांना नेटवर्क संधी देणे, सामाजिक जबाबदारी यांच्या प्रसार करणे या उद्दिष्टाने स्थापन झालेली आहे.ही संस्था मुंबई,पुणे, अहमदाबाद, दिल्ली, बेंगलोर या शहरांमध्ये सक्रिय आहे,पण आंतरराष्ट्रीय स्तरावरही कार्य करते. गिरीश टाटीया यांच्या या निवडीचे जैन समाजाने स्वागत केले असून, जैन संघटनेच्या वतीने त्यांचा शाल व माळा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विभाग अध्यक्ष प्रा.चंद्रकांत डागा,विभाग महासचिव अशोक राखेचा, शहर अध्यक्ष मयूर ओस्तवाल, शहर उपाध्यक्ष महेंद्र साबद्रा,कोशाध्यक्ष सुरेश गिडिया,सदस्य हितेंद्र जैन उपस्थित होते.

# चावरा हायस्कूल धुळे येथे एकोणावीस वर्ष आतील पन्नास बॉल क्रिकेट स्पर्धा

**धुळे, दि.१९- ५० बॉल्स क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या मान्यतेने धुळे जिल्हा ५० बॉल क्रिकेट असोसिएशन यांच्या वतीने १९ वर्षा आतील ५० बॉल क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धा चावरा हायस्कूल धुळे च्या मैदानावर दि. २२ मे २०२६ पासून होणार आहे. ५० बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ५० बॉल क्रिकेट असोसिएशन व शिवस्वराज्य प्रतिष्ठान महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे.**



धुळे जिल्ह्यात प्रथमच ही ५० बॉल क्रिकेट स्पर्धा होत असून ही स्पर्धा लीग पद्धतीने खेळविण्यात येणार असल्यामुळे युवा खेळाडूंना आपले क्रीडा गुण दाखविण्याची जास्तीत जास्त संधी मिळावी त्यांना प्रोत्साहन मिळावे हा उदात्त हेतू आयोजकांचा असून या स्पर्धेत धुळे जिल्ह्यासह नंदुरबार, जळगाव, नाशिक, मालेगाव जिल्ह्यातील संघ ही सहभागी होणार आहेत असे आयोजकांतर्फे जाहीर करण्यात आले आहे.

या स्पर्धेत अंतिम ४ विजयी संघांना प्रथम विजेता संघ, द्वितीय विजेता संघ, तृतीय विजेता संघ आणि चतुर्थ विजेता संघ असे ४ विजय संघांना उत्कृष्ट चषक ट्रॉफी देण्यात येणार असून स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक तसेच उत्कृष्ट यष्टिरक्षक यासह यासह स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूला मॅन ऑफ द सिरीज या सारखे वैयक्तिक बक्षिसांना आकर्षक चषकासह इतर बक्षीस दिली जाणार आहेत.

१९ वर्षे वयोगटातील या स्पर्धेत खेळणाऱ्या सर्व स्पर्धक खेळाडूंचा जन्म १/१/२००७ या तारखे नंतर असावा तसेच स्पर्धेत सहभागी खेळाडूंना आधारकार्ड ची सत्यप्रत जन्म दाखला ची सत्यप्रत आयोजकांकडे जमा करणे अनिवार्य आहे तसेच या स्पर्धेतील उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या फलंदाज गोलंदाज यासह यष्टिरक्षक अशा विविध खेळाडूंना ५० बॉल क्रिकेट महाराष्ट्राच्या संघात निवड होणार आहे असे आयोजकांनी जाहीर केले आहे.

# भाजीपाला उत्पादक शेतकरी व व्यावसायिक चिंताग्रस्त:आखाती देशातील युध्दाचा परिणाम

**धुळे, दि. १९ (प्रतिनिधी) : शहर परिसरातील भाजीपाला उत्पादक शेतकरी आणि व्यावसायिक भाजीपाल्यास दर मिळत नसल्याने चिंताग्रस्त झाले आहेत. खरे तर उन्हाळ्यात पालेभाज्या आणि फळभाज्यांची आवक कमी असते. त्यामुळे दरवाढ होते. पण, यंदा विचित्र परिस्थिती आहे. आखाती देशांमध्ये युध्दजन्य परिस्थितीमुळे फळभाज्या जात नाहीत. अधिक मासात लग्नतिथी नाहीत. त्यामुळे भाजीपाल्याचे दर कोसळले आहेत, असे शेतकरी आणि व्यावसायिकांचे म्हणणे आहे.**

धुळे तालुक्यातील अनेक गावामधील शेतकरी भाजीपाला आणि फळभाज्यांचे उत्पादन घेतात. दरवर्षी उन्हाळ्यात भाजीपाल्याची आवक कमी असते. त्यामुळे बाजारात दर वाढलेले असतात. त्याचा फायदा उत्पादक शेतकरी आणि व्यवसायिकांना होतो. पण, यंदा विचित्र परिस्थिती शेतकरी आणि भाजीपाला व्यवसायिक अनुभवत आहेत. यंदा भरपूर उत्पादन आहे. त्याचवेळी आखाती देशांमध्ये युध्दजन्य परिस्थिती असल्याने फळभाज्यांची त्या भागातील मागणी बंद आहे. यंदा अधिक मास असल्याने लग्नतिथी नाहीत. त्यामुळे पालेभाज्या, फळभाज्यांना मागणी नाही. बाजारात आवकच्या तुलनेत मागणी कमी आहे. परिणामी, पालेभाज्या आणि फळभाज्यांचे दर कोसळले आहेत. सध्या भाज्यांच्या किमती स्थिर असल्या तरी मागणी मात्र कमी प्रमाणात असल्यामुळे शेतकरी आणि व्यवसायिक चिंताग्रस्त आहेत. यंदा सर्वच फळभाज्या आणि पालेभाज्या बाजारात उपलब्ध आहेत. सर्वच उत्पादनांच्या किमती स्थिर असल्याचे व्यवसायिकांचे म्हणणे आहे. मागणी नसल्याने दरावर परिणाम झाला आहे. सध्या बाजारात टोमॅटो ४० ते ५० रुपये किलो, पालेभाज्या ३० रुपयास एक जुडी आहे. उन्हाच्या कडाक्यात भाज्यांचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी व्यवसायिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे, अशी माहिती पाचकंदील परिसरातील भाजी विक्रेते प्रशांत मराठे यांनी दिली.



# शिक्षण आयुष्यभर समृद्ध जगण्याचा, समाजाला प्रगत करण्याचा मार्ग- मनजितसिंग चव्हाण यांचे प्रतिपादन

शहादा,दि.१९(प्रतिनिधी)- शिक्षण ही केवळ शालेय पदवी नसून तो आयुष्यभर समृद्ध जगण्याचा आणि समाजाला प्रगत करण्याचा एक मार्ग आहे. शिक्षणामुळेच आपल्याला खरा हक्क प्राप्त होतो. या डिजिटल व आधुनिक युगात आपणास प्रगती करावयाची असेल तर शिक्षणाला पर्याय नाही. खरा सन्मानाचा मार्ग शिक्षणच दाखवतो. खरे शिक्षण घ्यायला कुठला शॉर्टकट नाही म्हणून विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी मेहनत घ्यावी व आपली स्वतःची, कुटुंबाची व समाजाची प्रगती घडवून आणावी असे उद्गार पोलीस निरीक्षक मनजितसिंग चव्हाण, मुंबई यांनी काढले.

आई गिरहूण कर्मचारी सेवा संघ व ग्रामपंचायत गणोर यांच्या संयुक्त विद्यमानाने गणोर गावातील सेवानिवृत्त कर्मचारी, नवीन सेवेत हजर झालेले कर्मचारी, गुणवंत कर्मचारी, अधिकारी व ग्रामस्थ तसेच गावातील इयत्ता दहावी-बारावी पास झालेले विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गणोर गावचे सरपंच राहुल रावताळे व प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई येथे सेवेत असलेले पोलीस निरीक्षक मनजितसिंग चव्हाण, अखिल भारतीय पावरा-बारेला समाज संघाचे अध्यक्ष नामदेव पटले, प्रमुख वक्ते मुंबई येथील बिर्ला महाविद्यालयाचे प्रा.डॉ. समजदार वळवके आदी उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक मनजितसिंग चव्हाण यांनी शिक्षण ही केवळ शालेय पदवी नसून तो आयुष्यभर समृद्ध जगण्याचा आणि समाजाला प्रगत करण्याचा एक मार्ग आहे असे सांगितले तर प्रा.वळवके यांनी आपल्या प्रसन्न वाणीने श्रोत्यांना समृद्ध केले व शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन केले.

# संजय गांधी निराधार योजनेसाठी दिव्यांगांनी युनिक कार्ड जमा करावे

धुळे - प्रतिनिधी - धुळे येथील संजय गांधी योजना विभागात ज्या दिव्यांग बांधवाचे जुने प्रमाणपत्र जोडून अनुदान सुरू करुन घेतले आहेत आणि अद्याप पर्यंत ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्रसह युनिक कार्ड काढले नसतील अश्या दिव्यांग बांधवानी दि १५ जून ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्रसह युनिक कार्ड काढून ते संजय गांधी निराधार योजनेच्या विभागात जमा करावे जे दिव्यांग बांधवांनी दि १५ जून पर्यंत ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्रसह युनिक कार्ड काढून जमा केले नाही तर त्यांचे अनुदान बंद करण्यांत येणार असल्याचे सामाजिक न्याय विभागाकडून कळविले असल्याचे संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार रविंद्रजी मगर यांनी सांगितले आहे त्याचप्रमाणे दिव्यांग बांधवाच्या आधार कार्ड आणि युनिक कार्ड यांच्यावरील जन्म तारीख सारखी आहे की नाही यांची पडताळणी करुन घेणे आवश्यक जर आधार कार्ड आणि युनिक कार्ड यांच्यामध्ये जन्म तारीखेची तफावत आढळून आल्यास दिव्यांग बांधवाचे अनुदान बंद होवू शकते त्यामुळे दिव्यांग बाधवांनी आधार कार्ड आणि युनिक कार्ड याच्यावर सारखीच जन्म तारखेचा उल्लेख करुन घ्यावा असेही आवाहन संजय गांधी निराधार योजना विभागाचे नायब तहसीलदार माननीय रविंद्रजी मगर आणि दिव्यांग पाच टक्के निधी नियंत्रण समिती सदस्या सौ कविता गजेंद्र पाटील यांनी यांनी केले आहे

# महिलांसाठी ई-केवायसी शासनाचे निर्देश नाहीत

**मुंबई, दि. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत ई-केवायसी करु न शकलेल्या महिलांना जिल्ह्याच्या महिला व बाल विकास कार्यालयात कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश शासनस्तरावरुन देण्यात आलेले नाहीत. याबाबतचा कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही,असे महिला व बालविकास विभागातर्फे कळविण्यात आले आहे.**

सदर वस्तुस्थिती लक्षात घेता, अशा चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवण्यात येवू नये, असे आवाहन महिला व बाल विकास विभागातर्फे करण्यात आले आहे. याबाबत सोशल मिडीयावर महिलांचा दिशाभुल करण्याचा प्रयत्न होत आहे.




# आर.सी. पटेल उर्दू विद्यालयात सामाजिक समता सप्ताह साजरा




**शिरपूर, दि.१९-शहरातील आर.सी. पटेल उर्दू विद्यालयात सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात आला.**

सामाजिक समता सप्ताह निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सर्वप्रथम संविधान उद्देशिकेचे वाचन सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी केले. सदर कार्यक्रमास माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक डॉ. मुबिनोद्दीन शेख व प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक डॉ. इफ्तेखार सैय्यद उपस्थित होते. इफ्तेखार सैय्यद यांनी संविधान उद्देशी के महत्व सर्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. नंतर काही विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर निबंधाचे वाचन केले. डॉ. मुबिनोद्दीन यांनी भारताचे संविधान कशाप्रकारे तयार करण्यात आले व त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची काय भूमिका होती ? याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिरोज कुरेशी यांनी केले. आभार सादिक कुरेशी यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.




**शब्दकोडे क्रमांक.२३६९**



**आडवे शब्द :** १.हळूच ४.एक संथ गतीचा उभयचर जीव ९.ओसाड १०.फुकटचा,बिनकामाचा १२.जड १४.कावळा १७.होकार २०.सारखेपणा २३.तमाश्यात सादर होणारे नाटय २४.हिंदीत-लोणचे २५.पक्का,कायम,दृढ २७.नांगराचा टोकदार भाग २७.मनास घातलेला बांध २९.पायताण ३०.वेगळा ३१.मृत्यू ३२.खूप आत ३३.अभंग रचणारे एक संत ३७.वस्तु मोजण्याचे एकक ३८.हुशार ३९.मुकाबला ४१.सुट ४३.खाटीक ४५.एक पत्त्यांचा डाव ४७.नुतन ४८.हक्क ४९.पती ५०.तराजू ५१.स्तंभ ५२.चोरी करणारा **उभे शब्द :** १.हत्यार २.पू ३.औषध ४.पाखरांना पिकांवर बसू न देण्यासाठी दोरीला दगड बांधून तयार केलेले औजार ५.टपकणारा ६.ग्राम ७.पती ८.इंग्रजीत-धीमा ११.जव १३.इच्छा १५.परीक्षा १६.इंग्रजी कालगणनेतील एक महीना १८.लहान मुलांच्या डोक्यावरील पहील्यांदा केस काढण्याचा विधी १९.मंथन २१.बेदम दिलेला चोप २२.गुर्मी २४.एक तुरट चवीचे फळ २६.चर्चा २७.बेकार २८.विश्रांती २९.घुसळून केलेली डाळ ३०.निष्कलंक ३४.कर्ण ३५.प्रभु रामचंद्रांचा एक बंधू ३६.अधिकारी ३८.पायजमा ३९.मेहुणा ४०.गस्तीवर असलेला ४२.रान ४३.पवन ४४.उलगडा ४६.भारतीय हवाई दलाच्या ताफ्यातील एक प्रकारचे लढाऊविमान ४८.धान्याचा कण - हिंदीत

**शब्दकोडे क्रमांक.२३६८ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | र | स्व | ती | | वा | व | र | | रं | ग | त |
| दा | वा | | न | वा | | र | स | ना | | र | न |
| नं | | दु | | ल | ग | | म | | अ | | य |
| द | र | बा | र | | त | व | | आ | व | ड | |
| | सा | र | | भ | | ही | र | | मा | र | वा |
| भा | त | | ख | ला | शी | | वि | मा | न | | ग |
| ज | ळ | म | ट | | त | ल | वा | र | | रे | णू |
| क | | स | प | क | | गा | र | | भो | | क |
| | चि | ल | ट | | ध | न | | स | क | ल | |
| नि | | त | | खो | ड | | रो | म | | बा | धा |
| य | स | | खवा | ब | | जा | मां | | क | ड | क |
| म | जा | क | | रे | स | | च | वि | ष्ट | | ट |

## पान १ वरुन

### ... आर्थिक संकटात सर्व भरडणार : गांधी

९४.०२ रुपयांच्या घरात पोहोचला आहे. पश्चिम आशियातील तणाव आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे पुढील काळात इंधन दरांमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनविण्यासाठी बळ देणार

निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे.

कंपन्यांनी सामंजस्य करार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आणण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण करावे. या कामी राज्य शासनाचा संबंधित विभाग त्यांना सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

यात्रसंगी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व कंपन्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांमध्ये करारांचे आदान-प्रदान करण्यात आले.

#### करारामुळे होणारी अणुऊर्जा व रोजगार निर्मिती

अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून  हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल. तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांचीगुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख  कोटींची गुंतवणूक करणार  आहे. यामधून  पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

### पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारणे गुन्हा नव्हे - हेले लिंग

स्थानी असून भारत १५७ व्या क्रमांकावर असल्याचा विशेष उल्लेख हेले लिंग यांनी केला. सत्तेत बसलेल्यांना प्रश्न विचारणे हीच पत्रकारिता असते, असे लिंग यांनी म्हटले. पत्रकार हेले लिंग यांनी पंतप्रधान मोदींना विचारलेल्या प्रश्नानंतर आणि भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत पत्रकार परिषदेत झालेल्या वादानंतर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. भारताशी संबंधित असलेल्या विषयांकडे पाश्चिमात्य माध्यमे कायम नकारात्मक दृष्टिकोनातून पाहतात, असा आरोप काही जणांनी केला. या सगळ्या पार्श्वभूमीवर पत्रकार हेले लिंग यांनी एक्सवर पोस्ट केल्या आहेत. मी कोणत्याही प्रकारची परदेशी हेर नसल्याचे  त्यांनी ठासून सांगितले आहे.

पत्रकार हेले लिंग यांचे स्पष्टीकरण

पत्रकारिता करताना अनेकदा वादावादी होऊ शकते. आधीपासून तयार असलेली उत्तरे स्विकारण्याऐवजी थेट उत्तरे मागणे, हे पत्रकारांचे काम आहे. एखाद्या व्यक्तीने प्रश्न टाळण्याचा प्रयत्न केल्यास पत्रकार त्यांच्याकडून स्पष्ट उत्तर मिळवण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करु शकतात, अस लिंग यांनी एक्स पोस्टमध्ये नमूद केले आहे. त्या दिवशी पंतप्रधान मोदी यांनी भारतीय पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी त्यांनी या संवादाशी संबंधित व्हिडीओवरील कमेंट्स बंद केल्या. सुरुवातीच्या पत्रकार परिषदेतही प्रश्न विचारण्याची परवानगी द्यायला हवी होती, असे लिंग म्हणाल्या. नॉर्वेच्या महिला पत्रकाराने वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर स्वत:ची ओळख आणि हेतू याबद्दल ऑनलाईन सुरु असलेल्या आरोपांवरही भाष्य केले. मला अशा प्रकारे लिहावे लागेल,याचा विचारही कधी केला नव्हता. मी कोणत्याही प्रकारची परदेशी हेर नाही. मला कोणत्याही परदेशी सरकारने पाठवलेले नाही. पत्रकारिता करणे माझे काम आहे आणि मी आता मुख्यत्वे नॉर्वेत काम करत आहे, असे स्पष्टीकरण लिंग यांनी दिले आहे. मी आणि माझ्या एका सहकाऱ्याने मानवाधिकाराशी संबंधित चिंतांबद्दल प्रश्न विचारले होते. भारतावर विश्वास का ठेवायचा हा प्रश्न मानवाधिकाराच्या मुद्द्यांसंदर्भात होता. पण, याबद्दल समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत, असा दावा लिंग यांनी केला.

### अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

३५ ते ४० वर्षे असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत व्यक्तीचे केस कुरळे व काळ्या रंगाचे असून वाढलेले आहेत. त्याच्या अंगात मळकट पांढऱ्या रंगाचा फुलबाह्यांचा शर्ट असून त्यावर बारीक फुलाफुलांची डिझाईन आहे. तसेच निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट परिधान केलेली आहे. दरम्यान, शिंदखेडा पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या मिसिंग प्रकरणांची पडताळणी सुरू असून समवयस्क बेपत्ता व्यक्तींबाबत माहिती गोळा करण्यात येत आहे. संबंधित अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटल्यास किंवा त्याबाबत कोणाकडे माहिती असल्यास त्यांनी शिंदखेडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक ढोके यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा  या मोबाईल क्रमांकावर त्वरित माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

### संदेशभूमी व लाळिंग किल्ला विकासासाठी निधी मिळणार- खा.बच्छाव

संदेशभूमी व लाळिंग किल्ला परिसराच्या विकासासाठी निधी मिळणार- खा.बच्छाव

व्यवस्था तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन संदेशभूमीला पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे.

लाळिंग किल्ला व लांडोर बंगला परिसर विकासावर भर

धुळे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर धुळे शहरापासून सुमारे ९ किमी अंतरावर असलेला लाळिंग किल्ला हा १३ व्या शतकातील फारुकी राजवटीतील ऐतिहासिक वारसा मानला जातो. किल्ल्याच्या परिसरात विस्तीर्ण मैदान, निसर्गरम्य परिसर, धबधबा तसेच लांडोर बंगला हा भाग पर्यटकांसाठी आकर्षण ठरू शकतो.या लँडोर बंगल्याशीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १९३७ मधील वास्तव्यासंबंधी ऐतिहासिक संदर्भ जोडला गेलेला आहे. त्यामुळे या संपूर्ण परिसरातही संविधान भवन व ग्रंथालय उभारण्यासह सुशोभीकरण, उद्याननिर्मिती, रस्ते, स्ट्रीट लाईट आणि इतर सुविधा विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

धुळे जिल्ह्याला पर्यटन नकाशावर नवी ओळख

खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांच्या पुढाकारातून संदेशभूमी आणि लाळिंग किल्ला-लांडोर बंगला परिसराचा विकास झाल्यास धुळे जिल्ह्याला ऐतिहासिक पर्यटन केंद्र म्हणून नवी ओळख मिळणार आहे. विद्यार्थ्यांसाठी अभ्यास व संशोधन केंद्र, पर्यटकांसाठी आकर्षक स्थळ तसेच स्थानिक नागरिकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या विकासकामांसाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, लवकरच निधी मंजूर करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांनी दिल्याने धुळेकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### पिसाळलेल्या कुत्र्यांना मारण्याची सुप्रीमची परवानगी

कराव्यात. यामध्ये, असाध्य आजारग्रस्त, पिसाळलेले किंवा स्पष्टपणे धोकादायक, आक्रमक असलेल्या कुत्र्यांच्या बाबतीत इच्छा मरणाचा अवलंब करण्याचाही समावेश आहे, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने या याचिका फेटाळून लावताना, सार्वजनिक ठिकाणी भटक्या कुत्र्यांची उपस्थिती ही एक चिंताजनक बाब असल्याचे नमूद केले.

## पान १ वरुन

### पोलिसांनाही हेल्मेट वापरणे सक्तीचे

पोलीस प्रशासनाकडून सातत्याने जनजागृती होते. मात्र आता स्वतः पोलीस दलानेच शिस्तीचा आदर्श निर्माण करण्याचा निर्धार केला, त्यामुळे या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. पोलिसांनी नियमांची अंमलबजावणी केल्यास नागरिक ही नियम पाळतील.

### धडगावला कुत्र्यांचा हल्ला बालीका गंभीर जखमी

नागरीकांनी धाव घेत कुत्र्यास हाकलले. त्या जखमी बालीकेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने बालीकेचा जीव वाचला असलातरी ती गंभीर जखमी झाली आहे. या भागात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. याकडे संबंधीत नगरपंचायतीचे दुर्लक्ष दिसून येत आहे. त्यामुळे धडगाव परिसरात मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. यापूर्वी अनेकदा तोंडी व लेखी तक्रारी करुनही नगरपंचायतीने लक्ष दिले नाही. आता मोकाट कुत्रे अंगणावर धावून येत हल्ला करु लागले आहे. बालीकेवर कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्याची दखल घेवून नगरपंचायतीने तात्काळ मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होवू लागली आहे.

### नीट प्रकरणी मोटेगावकरच्या मुलाची चौकशी

मोटेगावकरच्या मुलासोबत दोन ते तीन वकील देखील आहेत. कारण शिवराज मोटेगावकरचा मुलगा हा बारावीला म्हणजे अल्पवयीन आहे. त्यामुळे त्याच्यासोबत वकील देखील आहेत. शिवराज मोटेगावकरच्या मुलासोबत इतर काही शहरांमधील पालक आणि विद्यार्थी आहेत. जे शिवराज मोटेगावकरच्या आरसीसी क्लासमध्ये शिकत होते. त्यांना मोटेगावकरच्या मुलांना फुटलेला पेपर मिळाला असल्याचा संशय आहे. शिवराज मोटेगावकरच्या बँक अकाउंटमध्ये काही ट्रान्झेक्शन आढळून आलेले आहेत. जे या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून झाले आहेत. त्या अनुषंगाने त्या विद्यार्थ्यांना देखील पुण्यात सीबीआय ऑफिसने चौकशीसाठी बोललेले आहे.

मेडिकल कॉलेजसाठी मुलावर मोठा डाव

शिवराज मोटेगावकर याने त्याच्या मुलासाठी पेपर लिक केल्याचा संशय  सीबीआयला आहे. मोटेगावकरच्या मुलाने यावर्षीच १२ वी उत्तीर्ण केली आहे आणि  नीटचा पेपरही दिला आहे. मोटेगावकर याला मुलाच्या रुपाने मेडीकल कॉलेजचे स्वप्न पुर्ण करायचे होते, अशी चर्चा आता होत आहे. मोटेगावकर आणि त्यांची पत्नी ह्या दोघांपैकी एकही जण डॉक्टर नाही.  स्वतःचे मेडिकल कॉलेज टाकायचे असेल तर तुम्ही किंवा तुमच्या घरातील एखादा व्यक्ती त्या क्षेत्रात सक्रीय, अनुभवी असणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलगा जर डॉक्टर झाला तर आपण त्याच्या नावाने मोठं हॉस्पिटल आणि मेडीकल कॉलेज उभारू, अशी मोटेगावकरांची योजना असल्याचे बोलले जात आहे.

### दुधाळे शिवारात घरफोडी ऐवज लंपास

२५ हजाराचा ऐवज लंपास केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिस ठाणे प्रभारी निलेश देसले यांच्यामार्गदर्शनाखाली पोसई किरण पाटील यांच्याकडे तपास देण्यात आला आहे. पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवतांना सोन्याचे जूने दर आकारले जातात.त्यामुळे आकडा कमी वाटतो परंतू सोन्या व चांदीचे दर वाढल्याने हा आकडा पाच लाखांपेक्षा अधिक असू शकतो.

### शिंदखेड्यात अतिक्रमण प्रश्नी दहा मिटरची मागणी

झाली आहे. या रस्त्यावरून शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, व्यापारी व नागरिक प्रवास करत आहेत. यामुळे अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नागरिकांनी प्रशासनाला स्पष्टपणे सांगितले की, मुलांना शाळेत पाठवताना भीती वाटते, रस्ता सुरक्षित आणि मोकळा करावा.अतिक्रमण करणाऱ्या काही व्यवसायिकांनी व्यवसाय वाचवा, स्थगिती द्या, मर्यादित तोडफोड करा अशा मागण्या केल्या आहेत . मात्र, नागरिकांचे म्हणणे आहे की, नियम मोडणाऱ्यांना नियमाच्या नावाखाली संरक्षण देणे न्याय्य नाही. मुख्य रस्ता सर्वांसाठी आहे आणि तो कुणाच्या खाजगी मालमत्तेसारखा नाही.अतिक्रमणामुळे फूटपाथ गिळंकृत झाले आहेत, रस्ता अरुंद झाला आहे, गाळे वाढले आहेत आणि सार्वजनिक जागा व्यापल्या गेल्या आहेत. या परिस्थितीमुळे चालता येण्याजोग्या रस्त्याचा प्रश्न गंभीरपणे उपस्थित झाला असल्याचे मत व्यक्त होत आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या आहेत. मात्र, काही व्यवसायिकांना २६ जून पर्यंत हाय कोर्ट स्टे मिळाल्याचे समजते यामुळे आता प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.प्रशासनाने नियमांचे पालन करत कठोर पाऊल उचलले पाहिजे, अन्यथा शहराच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होईल असे मत व्यक्त होत आहे.शिंदखेडा शहर विकासाच्या मार्गावर आहे. रुंद रस्ते, सुरक्षित वाहतूक, अपघातमुक्त शहर आणि व्यवस्थित सार्वजनिक जागा ही भविष्यातील गरज आहे. विकासाला अतिक्रमण आड येऊ नये, हे सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने कठोर निर्णय घेणे गरजेचे आहे.शिंदखेडा शहरातील अतिक्रमणाचा मुद्दा आता फक्त गाळा किंवा दुकानाचा नाही, तर संपूर्ण शहराच्या भवितव्याचा प्रश्न बनला आहे. नागरिक, महिला, विद्यार्थी व व्यापारी प्रशासनाकडे लक्ष वेधत आहे की, नियमांचे पालन करून अतिक्रमण काढावे. एकंदरीत पाहता आता प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ई-चलन संदर्भातील सकारात्मक भूमिका घेऊ- सरनाईक

अध्यक्ष  प्रदीप राठोड, सदस्य मनोज चौगुले, महेंद्र काळभोर, पंकज त्रिपाठी, अशोक शिंदे, गौरव कुसाळे, रफिक रावथर, अशोक कुचकोरवी, राजु ढाले, सुनील मगदुम आदी उपस्थित होते.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात जुन्या ई-चलनांची सरसकट रद्दबातल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेगमर्यादेचा पुनर्विचार, एएनपीआर कॅमेऱ्यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा, वाहनांमधील अंतराच्या नियमांमध्ये व्यवहार्य बदल तसेच दंडावरील चक्रवाढ पद्धत रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहतूक व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे वाहतूकदारांच्या अडचणी शासन गंभीरपणे ऐकत असून, नियमांची अंमलबजावणी करताना अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल. ई-चलन आणि वेगमर्यादा संदर्भातील तक्रारींबाबत संबंधित विभागांकडून सविस्तर अहवाल मागवून आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. तसेच, रस्ते सुरक्षा अबाधित ठेवत वाहतूकदारांना दिलासा मिळेल, अशा पद्धतीने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन प्रयतक्शील असल्याचेही त्यांनी सांगितले.

कोल्हापूर जिल्हा वाहतूकदार समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### कवयित्री पूजा सोनारना हिरकणी पुरस्कार

यांच्या हस्ते व लेखक एकनाथ आव्हाड, गजलकार अजय बिरारी, हिरकणी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ.वनमाला पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कुसुमाग्रज स्मारक येथील विशाखा हॉल मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रास्ताविक आयोजक व हिरकणी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. वनमाला पाटील यांनी केले. यावेळी अनेक नवोदित लेखक, लेखिका, कवी व कवयित्री यांच्या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.  नवोदित कवि-कवयित्रि यांचे काव्य वाचन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखक एकनाथ आव्हाड होते. सूत्रसंचालन चंदना तरवडे यांनी केले.आभार प्रदर्शन वनमाला पाटील यांनी केले.हा पुरस्कार मिळाल्या बद्दल तोरखेडा तालुका शहादा येथील  कवयित्री पूजा योगेश सोनार यांचे विविध स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## निधन वार्ता

### विजया सोनार



धुळे, दि.१९- देवपूर वाडीभोकर रोड परिसरातील प्लॉट नं.१ क्षिरे कॉलनीतील रहिवासी विजया कांतीलालशेठ सोनार यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावाई असा परिवार आहे.

### संतोष पाटील



दोंडाईचा, दि.१९- दोंडाईचा येथील पी.बी. बागल आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजचे सेवानिवृत्त प्राचार्य संतोष चिंधा पाटील यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ असा परिवार आहे. अहिंसा बी.टेक,कॉलेजचे प्राचार्य नितीन पाटील यांचे ते वडील होत.

### शांताबाई पाटील



शहादा, दि.१९- निझर तालुक्यातील यावल जि.तापी येथील शांताबाई रामदास पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुना, नातवंडे असा परीवार आहे. त्या दिलीप रामदास पटेल व प्रकाश रामदास पटेल यांच्या मातोश्री होत.

## तापमानाचा पारा सातत्याने त्रेचाळीस पशुपक्षांसाठी पाण्याची व्यवस्था करा

**धुळे, दि. १९ (प्रतिनिधी) : शहर आणि जिल्ह्यात तापमानाचा पारा सातत्याने त्रेचाळीस अंशाची पातळी गाठत आहे. त्यामुळे हवेत कोरडेपणा वाढला आहे. सहाजिकच त्यामुळे तहान वाढली आहे. पण, त्याचवेळी पाण्याची कमतरता भासू लागली आहे. त्याचा सर्वाधिक परिणाम पशु-पक्षांवर झाला आहे. नैसर्गिक पाणवठे कोरडे पडल्याने प्राणी-पक्षांना तहान भागवायची कुठे, असा प्रश्न पडला आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि मानवता धर्म जोपासण्यासाठी नागरिकांनी पशुपक्षांसाठी आपल्या घराच्या परिसरात पाण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन पशुपक्षी संवर्धन समितीच्या सदस्यांनी केले आहे.**

सध्या धुळे शहरासह जिल्ह्याचे तापमान वाढलेले आहे. गेल्या काही आठवड्यांपासून तापमान सतत अंशावर आहे. त्यामुळे हवेत कोरडेपणा वाढला आहे. सकाळी नऊ पासुनच उन्हाची तीव्रता वाढत आहे. वाढत्या तापमानामुळे तहान लागण्याचे प्रमाण वाढले आहे. या परिस्थितीचा परिणाम पशुपक्षांवर जास्त झाला आहे. नैसर्गिक पाणवठे कोरडे पडल्यामुळे तहान भागवायची कुठे, असा प्रश्न पशुपक्षांपुढे आहे. तीव्र उष्णतेमुळे पाण्याचे स्त्रोत आटले असून, पाखरांचा पाण्यासाठी टाहो पाहायला मिळत आहे. जिल्ह्यात मे महिन्याची सुरुवातच प्रचंड उष्णतेने झाली आहे. तापमान ४२ अंशांच्या वर गेल्याने संपूर्ण जिल्हा होरपळून निघत आहे. या कडकडत्या उन्हात माणसांना सावलीचा आणि पाण्याचा आधार मिळतो. मात्र मुक्या पशू-पक्ष्यांचे अतोनात हाल होत आहेत. ग्रामीण भागातील आणि जंगलातील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत कोरडे पडल्याने, पक्षी आणि प्राणी पाण्याच्या शोधात भटकत आहेत. सध्या शहर तसेच परिसरात विविध भागात निसर्ग प्रेमी नागरिकांनी पाण्याचे भांडे पशुपक्षांचे तहान भागवण्यासाठी भरून ठेवले असल्याचे पहावयास मिळत आहे. अनेक पक्षी आपली तहान शमविण्यासाठी या ठिकाणी येतात. उन्हाच्या तीव्रतेमुळे पक्ष्यांमध्ये उष्माघात  होण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक ठिकाणी पक्षी उन्हामुळे चक्कर येऊन जमिनीवर पडत असल्याच्या घटना समोर येत आहेत. वाढलेले तापमान आणि पाण्याची कमतरता यामुळे पशू-पक्षी मरण पावण्याची भीती निर्माण झाली आहे. उन्हाचा कडाका आगामी काही दिवस असाच राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर, छतावर किंवा बाल्कनीमध्ये पक्ष्यांसाठी पाणी असलेले मातीचे भांडे ठेवावे. असे आवाहन प्रशासन आणि पर्यावरण प्रेमीनी केले आहे.





**भाड्याने देणे आहे**

घर भाड्याने देणे आहे. गोडावुनसाठी पण सुशिल नगर, ४४ A, नवजीवन ब्लड बँकेचे मागे, धुळे
9922086965

**भाड्याने देणे आहे**

सर्व सोयींनी सुसज्ज असे टु रुम किचन भाड्याने देणे आहे.
पत्ता - ३, आशिर्वाद, गव्हर्नमेंट सर्व्हंट कॉलनी, हिरे भवन जवळ, धुळे
9324172109

**फ्लॅट भाड्याने पाहिजे**

1BHK / 2BHK फर्निश / सेमी फर्निश फ्लॅट भाड्याने पाहिजे.
-: संपर्क :-
9420165060

**पाहिजे**

Ram Academics ऑफिस जॉब Intership साठी मुलं-मुली पाहिजे. Ms Word, Excel, PPT, Laptop पुर्ण येणे व English चांगले येणे आवश्यक. Freshers चालतील. अशोका स्टेट, 2nd फ्लोर, संतोषी माता मंदिर, धुळे
Whatsapp Call
7666272545
9022552545

**राखणदार पाहिजे**

एक रहीवासी किंवा सहकुटंबियांसाठी राखणदार पाहिजे. काम फक्त राखणदारांची वस्ती फागणा फार्मवर
वय ७० पेक्षा कमी असावे
-: संपर्क :-
8888820305

**शेतजमीन विकणे**

साक्री रोडटच तीन एकर शेतजमीन विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे आहे**

नटराज टॉकीजमागे वाखारकर नगरमध्ये ३१०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**जागा विकणे**

मालेगाव रोटटच ४० बाय १०० फुटाची जागा योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**जागा भाड्याने देणे**

आग्रारोड लगत दोन रोड कॉर्नर जागा भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
डी.आर. प्रॉपर्टीज
9422289693

**जागा भाड्याने देणे**

हॉस्पिटल तसेच ऑफिससाठी जागा भाड्याने कराराने देणे आहे.
-: संपर्क :-
9423978968
9960486132

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**अनारसे**

खास अधिक मासा साठी उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील
नोंदणी आवश्यक आहे.
अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
9049902201
7887750864

**पाहिजेत**

दुकानात कामासाठी हुशार व होतकरु मुले/मुली फूलटाईम त्वरीत पाहिजेत.
- समक्ष भेटा -
मुंदडा बुक स्टॉल
पारोळा रोड ग.नं. ६, कॉर्नर, धुळे

**वायरमन पाहिजे**

इलेक्ट्रिशियन कामासाठी परमनंट वायरमन पाहिजे.
ग.नं.५, धुळे
-: संपर्क :-
9765373559
9588418856





हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०